वर्ष - 9 । अंक - 151 UDYAM-MH-26-0158827




# महाईन्यूज ™



पान 2 वरुन...

झाडाला धडकून कारचा चक्काचूर; एकाचा मृत्यू

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 24 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

"बड्या नेत्याच्या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ"

# मुंबईत सत्तासंघर्ष; ठाकरेंची शिवसेना महापौरपदी?




**महाईन्यूज**
**मुंबई :** **मुंबई महापालिकेवर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्त शिवसेनेचाच भगवा फडकला पाहिजे, यासाठी एकनाथ शिंदे यांनी राजकीय मतभेद, मान-अपमान बाजूला सारून उद्धव ठाकरे यांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी जाहीरपणे केलं आहे.**



## मुंबईत कोणत्या पक्षाने किती जागा जिंकल्या?


मुंबईच्या महापौर पदासाठी गुरुवारी झालेल्या सोडत प्रक्रियेत हे पद सर्वसाधारण प्रवर्गातील महिलेसाठी राखीव ठरलं. बीएमसी निवडणुकीत भाजप ८९ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे., तर शिंदेंच्या शिवसेनेने २९ जागा जिंकल्या आहेत. अशाप्रकारे दोन्ही पक्षांनी महायुती म्हणून ११८ जागा जिंकल्या आहेत, ज्या बहुमताच्या आकड्यापेक्षा ४ जागा जास्त आहेत. तर दुसरकीडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ६५ जागा जिंकल्या आहेत आणि राज ठाकरे यांच्या मनसेने सहा आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने एक जागा जिंकली आहे. याशिवाय, काँग्रेसने २४ जागा जिंकल्या असून, एआयएमआयएमने ८, अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ३ आणि समाजवादी पक्षाने दोन जागा जिंकल्या आहेत.

यासंदर्भात मीडियाशी बोलताना भास्कर जाधव म्हणाले, "खरं तर माझ्या मनात या विषयी प्रचंड दु:ख आहे. की, यंदा हे वर्ष बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीचं वर्ष आहे आणि त्याच वर्षी बाळासाहेबांच्या शिवसेनेचा महापौर हा मुंबई महापालिकेत असणार नाही. यासारखं दु:ख नाही. म्हणून मी जे कोणी बाळासाहेबांचे विचार आम्ही पुढे घेवून जातो म्हणून सांगतात. जे कोणी बाळासाहेबांचे खरे आम्ही वारसदार म्हणून सांगतात, त्या सर्वांना आवाहन वजा विनंती करतो."

तसेच, "हे बाळासाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. इथंच तुमची खरी बाळासाहेबांवर श्रद्धा आहे का? बाळासाहेबांवर तुमचा विश्वास होता का? बाळासाहेबांसमोर तुम्ही नतमस्तक होवू इच्छिता का? बाळासाहेबांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली अर्पण करून इच्छिता का? आणि जर करत असाल तर तुम्ही आज उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना सांगितलं पाहीजे." असं भास्कर जाधव यांनी आवाहन केलंय. याशिवाय, "ज्या शिवेसना, भाजपबरोबर एकनाथ शिंदे आहेत, त्या एकनाथ शिंदेंना मी आवाहन करतो वजा विनंती मी करतो, की तुम्ही भाजपला सांगितलं पाहिजे, केंद्रात आम्ही तुमच्या सरकारला पाठिंबा दिलाय आम्ही तुमच्याबरोबर राहू, महाराष्ट्रात तुमच्या सरकारला पाठिंबा दिलाय आम्ही तुमच्या बरोबर आहोत. पण हे वर्ष हिंदू हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचं जन्मशताब्दी वर्ष आहे आणि म्हणून आम्ही मुंबईवर हा शिवसेनाचाच भगवा झेंडा फडकला पाहीजे आणि बाळासाहेब ठाकरे यांचे वारसदार असलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या म्हणजेच खऱ्या शिवसेनेच्या झेंडा फडकला पाहिजे." असं भास्कर जाधवांना म्हटलं. याचबरोबर "त्यामुळे आम्ही आमचे राजकीय मतभेद बाजूला सारून, आम्ही शिवसेना प्रमुखांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे जो उमेदवार देतील त्याला आम्ही मदत करू हे सांगण्याचं धाडस एकनाथ शिंदे यांनी दाखवलं पाहीजे. हे धाडस भास्कर जाधव असता तर नक्कीच दाखवलं असतं."असंही भास्कर जाधव यावेळी म्हणाले.

तसेच, "एकनाथ शिंदेंनी १०० टक्के पाठिंबा दिला पाहीजे. त्यांनी भाजपला पाठिंबा देता कामानये. बाळासाहेबांचे तुम्ही खरे वारसदार म्हणून सांगत असाल, बाळासाहेबांमुळे आम्ही घडलो, बाळासाहेबांमुळे आम्ही इथे आलो सांगत असाल, तर बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीच्या वर्षाच्या दिवशी तुम्ही तुमचा मान, सन्मान, गर्व, अहंकार, अधिकार, मान-अपमान बाजूला सारून पाठिंबा दिला पाहीजे. बाळासाहेबांच्या शिवसेनेचा झेंडा फडकवण्यासाठी तुम्ही कमीपणा घेतला पाहीजे. असं माझं जाहीर आवाहन वजा विनंती आहे.

महापौर निवडीसाठी एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना पाठिंबा दिला पाहीजे. बाळासाहेबांना मानत असतील तर एकनाथ शिंदेंना ते दातृत्व दाखवावं लागेल." असं आवाहन भास्कर जाधव यांनी केलं आहे.



# झाडाला धडकून कारचा चक्काचूर; एकाचा मृत्यू

## चालकाचे नियंत्रण सुटल्याने पहाटेच्या सुमारास दुर्घटना; तीन जण गंभीर जखमी

**महाईन्यूज**

**पुणे: सोलापूर महामार्गावर चालकाचे नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर तिघेजण जखमी झाले आहेत. कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील इनामदार वस्ती परिसरात आज सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. हा अपघात एवढा भीषण होता की यामध्ये चारचाकीचा चक्काचूर झाला आहे.**





गौरख त्र्यंबक माने (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर समाधान अंकुश बाबर (वय 25, धंदा केळी व्यवसाय, रा. कुगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर), विजय सूर्यकांत माने, गोरख त्र्यंबक माने व अलिकेश खान असे अपघातात जखमी झालेल्या तिघांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, समाधान बाबर यांचे मामा विजय माने, चुलत मामा गोरख माने व त्यांचे मित्र अलिकेश खान असे चौघेजण मुंबई येथे केळी एक्सपोर्ट संदर्भात असलेली मीटिंग कामी गेले होते. मिटिंग झाल्यानंतर गुरुवारी संध्याकाळी मुंबई येथून रात्री करमाळ्याकडे निघाले होते. हडपसर पुणे येथे सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास आले. नंतर विजय माने हे गाडी चालवण्यास बसले होते. तर त्यांच्या शेजारी सीटवर गोरख माने हे बसले होते. तर पाठीमागील सीटवर समाधान बाबर व विजय माने हे बसले होते.

उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रयागधाम फाटा व कोरेगाव मूळ जवळ आले असता विजय माने यांचे चारचाकीवरील नियंत्रण सुटले व ती हायवे रोडच्या डाव्या बाजूला खाली जाऊन झाडाला धडकली. या अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले तर गौरख माने यांच्या डोक्याला व हातापायाला गंभीर दुखापत झाली. सदर घटनेची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तसेच सर्व जखमींना नागरिकांच्या मदतीने उरुळी कांचन येथील सिद्धीविनायक रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, उपचारादरम्यान गौरख माने यांचा मृत्यू झाला तर तिघांवर उपचार सुरु आहेत. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार उरुळी कांचन पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.

# बजाज पुणे ग्रँड टूरचा सायकलिंगमध्ये ऐतिहासिक विक्रम

**महाईन्यूज**

**पुणे: पुणे ग्रँड टूर-२०२६' या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा आज अंतिम टप्पा पूर्ण होताच ही स्पर्धा यशस्वीरीत्या संपन्न झाली.**

उत्कृष्ट नियोजन, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि पुणे व पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही स्पर्धा देश-विदेशातील क्रीडाप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरली.

या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण भारत व भारतीय उपखंडात 'स्टार स्पोर्ट्स' आणि 'जिओ हॉटस्टार'वर, तर युरोपसह जगातील ७० हून अधिक देशांमध्ये 'एचबीओ मॅक्स' आणि 'डिस्कवरी प्लस' या आंतरराष्ट्रीय माध्यमांद्वारे करण्यात आले. या जागतिक थेट प्रक्षेपणातून पुणे जिल्ह्यातील पर्यटनस्थळे, विस्तीर्ण व सुशोभित रस्ते, ऐतिहासिक वास्तू, सांस्कृतिक वारसा, मराठी नाटक व संगीत परंपरा, क्रीडा संस्कृती, पर्यावरणपूरक उपक्रम आणि आधुनिक पायाभूत सुविधांचे प्रभावी दर्शन जगभरातील प्रेक्षकांना घडले.

आज दुपारी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथून सुरू झालेला अंतिम टप्पा पाषाण, एनसीएल मैदान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौक, राजीव गांधी पूल, रक्षक चौक, काळेवाडी, डांगे चौक, संत तुकाराम महाराज पूल, स्वामी विवेकानंद चौक, भक्ती-शक्ती चौक, त्रिवेणी नगर, पीसीएनटीडीए, स्पाईन रोड, नळस्टॉप, लक्ष्मीनारायण चौक, सेव्हन लव्हज चौक, टर्फ क्लब, नॅशनल वॉर मेमोरियल, साधू वासवानी चौक, शनिवारवाडा, साखर संकुल, एफ.सी. रोड आणि



जंगली महाराज रोड मार्गे बालगंधर्व रंगमंदिर येथे समारोपाला पोहोचला.

या अंतिम टप्प्यात पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांतील नागरिकांनी तब्बल ९९.१५ किलोमीटरच्या मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा उभे राहत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सायकलपटूंना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुमारे १४ लाख नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून खेळाडूंना केलेले स्वागत हे जागतिक सायकल स्पर्धांच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले असून, नागरिकांच्या सहभागाच्या दृष्टीने नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे.

स्पर्धा मार्गावरील चौकांचे सुशोभीकरण, स्वच्छता, नियोजनबद्ध वाहतूक व्यवस्था, हरित पट्ट्यांची सजावट, एलईडी स्क्रीन, सांस्कृतिक सादरीकरणे आणि नागरिकांचा उत्साही सहभाग यामुळे पुणे शहराचे सौंदर्य थेट प्रक्षेपणातून जगभर पोहोचले. समालोचकांनी पुण्याचा इतिहास, सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिक वाटचाल ओघवत्या शैलीत मांडली. ऐतिहासिक शनिवारवाडा, मराठी सांस्कृतिक ओळख जपणारे बालगंधर्व रंगमंदिर, श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, लाल महाल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, जंगली महाराज रोडवरील पाताळेश्वर मंदिर आदी स्थळांची माहिती स्पर्धेदरम्यान देण्यात आल्याने पुण्याचा वारसा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम जागतिक व्यासपीठावर अधोरेखित झाला.

याआधीच्या तीन दिवसांतही पुणे जिल्ह्यातील गड-किल्ले, पर्यटनस्थळे आणि सांस्कृतिक वैभवाची माहिती थेट प्रक्षेपणातून देण्यात आली होती.या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायकलपटू, तांत्रिक अधिकारी, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने पुण्यात दाखल झाले होते. त्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन, वाहतूक विभाग, आरोग्य यंत्रणा, स्वयंसेवक आणि विविध शासकीय विभागांनी उत्कृष्ट समन्वयाने काम केले. कोणताही अनुचित प्रकार न घडता स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल जागतिक सायकल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये न्यायव्यवस्थेला नवे बळ

## अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे रविवार २५ जानेवारी रोजी लोकार्पण

**महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाच्या आणि सक्षम न्यायव्यवस्थेच्या दिशेने एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात असून, शहराला आता स्वतःचे हक्काचे “अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय” लाभत आहे.**




“ पिंपरी चिंचवड शहराच्या न्यायालयीन हक्कासाठीचा हा ऐतिहासिक क्षण अनुभवण्यासाठी व लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण घटनेचे साक्षीदार होण्यासाठी नागरिक व वकिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.

- ॲड. उमेश राम खंदारे
(सचिव, पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन)

या न्यायालयाचे भव्य लोकार्पण सोहळा रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी १०.३० वाजता, मोरवाडी येथील जुनी न्यायालयीन इमारत येथे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश संदीप मारणे साहेब व आसिफ डॉक्टर साहेब यांच्या हस्ते तर पुणे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश एम.के. महाजन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

पिंपरी चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक व लोकसंख्येच्या शहरासाठी स्वतंत्र अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची आवश्यकता दीर्घकाळापासून जाणवत होती. या न्यायालयाच्या स्थापनेमुळे न्यायप्रक्रिया अधिक गतिमान, सुलभ व प्रभावी होणार असून, नागरिकांना वेळेत आणि सहज न्याय मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

ही केवळ प्रशासकीय घडामोड नसून, शहरातील सर्वसामान्य नागरिक, वकील वर्ग, न्यायालयीन कर्मचारी व संपूर्ण न्यायव्यवस्थेसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. न्यायालयीन कामकाजाचा वाढता भार लक्षात घेता, हे अतिरिक्त न्यायालय नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणारे आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्थेचा आदर्श निर्माण करणारे ठरेल.

पिंपरी चिंचवड शहर हे राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या औद्योगिक शहरांपैकी एक असून, येथे मोठ्या प्रमाणात औद्योगिक, फौजदारी, दिवाणी तसेच श्रमविषयक प्रकरणांची संख्या सातत्याने वाढत आहे. यामुळे न्यायालयीन कामकाजाचा ताण वाढत होता. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना झाल्याने न्यायप्रक्रिया अधिक वेगवान, कार्यक्षम आणि नागरिकाभिमुख होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

या न्यायालयाच्या स्थापनेमुळे नागरिकांना न्यायासाठी पुणे न्यायालयात वारंवार जावे लागणार नाही, वेळेची आणि आर्थिक बचत होणार असून, न्यायप्रणालीवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. तसेच वकील वर्ग, न्यायालयीन कर्मचारी व संबंधित यंत्रणांसाठीही कामकाज अधिक सुसूत्रपणे पार पडण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

या न्यायालयाच्या स्थापनेसाठी सातत्याने प्रयत्न करणारे शहरातील सर्व लोकप्रतिनिधी, बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य, पोलीस प्रशासन, वकील बंधू-भगिनी तसेच जागरूक नागरिक यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातूनच हा महत्त्वाचा टप्पा साकार झाला आहे.

# शहरात भटक्या कुत्र्यांचा हैदोस ! दररोज ५० नागरिकांचे लचके

**महाईन्यूज**

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटनांनी धोक्याची पातळी ओलांडली असून, शहरवासीय सध्या प्रचंड दहशतीखाली वावरत आहेत. गेल्या काही दिवसांत कुत्र्यांनी चावा घेण्याच्या प्रमाणात मोठी वाढ झाली असून, दररोज सरासरी ५० नागरिकांना रुग्णालयात धाव घ्यावी लागत आहे. या वाढत्या उपद्रवामुळे महापालिका प्रशासनाच्या ‘श्वान निर्बिजीकरण’ मोहिमेवरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**



शहरातील सोसायट्यांचे आवार, सार्वजनिक उद्याने आणि गजबजलेले रस्ते या ठिकाणी भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. विशेषतः पहाटे फिरायला जाणारे नागरिक आणि सायंकाळी मैदानात खेळणारी लहान मुले यांच्यावर हे कुत्रे हल्ले करत आहेत. अनेक ठिकाणी कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी रस्त्यावर उभ्या राहत असल्याने दुचाकीस्वारांचे अपघात होण्याचे प्रमाणही वाढले आहे. केवळ चावाच नव्हे, तर कुत्र्यांच्या भीतीपोटी वाहने घसरून जखमी होणाऱ्यांची संख्याही मोठी आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे प्राप्त झालेल्या माहितीनुसार, शहरातील वायसीएम रुग्णालय आणि इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या रुग्णालयांमध्ये दरमहा शेकडो नागरिक ‘डॉग बाईट’वर उपचार घेण्यासाठी येत आहेत. प्रशासनाकडून कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात रस्त्यावरील कुत्र्यांची संख्या कमी होताना दिसत नाही.



अनेक भागात कुत्र्यांच्या टोळ्या आक्रमक झाल्याने महिला आणि वयोवृद्ध नागरिकांनी घरातून बाहेर पडणेही कठीण झाले आहे.

शहरातील अनेक ठिकाणी उघड्यावर टाकले जाणारे अन्न आणि हॉटेलबाहेरील कचरा यांमुळे भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. रात्रीच्या वेळी हे कुत्रे अधिक हिंसक होत असून, नागरिकांच्या अंगावर धावून जाण्याच्या तक्रारींमध्ये सातत्याने वाढ होत आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाकडून केवळ ‘पकडा-पकडी’चा फार्स केला जात असल्याची भावना जनसामान्यांमध्ये आहे.

भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर केवळ निर्बिजीकरण हा एकमेव उपाय पुरेसा नसून, प्रशासनाने अधिक कडक पावले उचलण्याची गरज आहे. कुत्र्यांचे वाढते हल्ले रोखण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाईन आणि तातडीचे पथक तैनात करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अन्यथा, या समस्येचे स्वरूप अधिक गंभीर होऊन एखादी मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



## भूमिका

**भारताचा विकास हा निर्यातीऐवजी देशांतर्गत पुरवठा आणि सार्वजनिक गुंतवणुकीतून झालेला दिसून येतो. अनेकदा सरकार निर्यातीला स्पर्धेचे रूप देण्यासाठी रुपयाचे मूल्य कमी होऊ देते किंवा त्यास प्रोत्साहन देते.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे हळूहळू अवमूल्यन होत आले आहे. 2024 मध्ये मोठ्या घसरणीला सुरुवात झाली.**

# जीडीपी वृद्धीने रुपयाची घसरण थांबेल?

या काळात ऐतिहासिक 3.30 रुपये प्रतिडॉलरने घसरत तो 2025 च्या मध्यापर्यंत 83.4 रुपये आणि डिसेंबर 2025 पर्यंत जवळपास 90 रुपये प्रति डॉलरवर पोहोचला. 1947 ते 1966 मध्ये बि—टिश पाऊंडशी संबंधित विनिमय दर स्थिर राहात असल्याच्या भीतीने रुपया सुमारे 4.4 टक्के वार्षिक दराने घसरला. 1966 ते 1976 या दरम्यान 1966 मधील अवमूल्यन आणि कडक धोरण अंमलात आणल्याने रुपयाचे अवमूल्यन वार्षिक 1.8 टक्क्यांपर्यंत मंदावले.

1976 ते 1986 या काळात तेलाने झटका दिल्याने आणि आर्थिक दबावामुळे वार्षिक 3.5 टक्क्यापेक्षा अधिक घसरण पाहावयास मिळाली तर 1986 ते 1999 या काळात सर्वाधिक 10.8 टक्के वार्षिक घसरण अनुभवास आली. ही घसरण कर्जाचा वाढता डोंगर आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे झाली. आर्थिक उदारीकरणानंतर 1996 पासून रुपयांच्या घसरणीचा माहौल कमी राहिला. 1996 ते 2004 या काळात वार्षिक तीन टक्के, 2004 ते 2014 या काळात वार्षिक 2.9 टक्के व 2014 ते 2024 या काळात वार्षिक 3.3 टक्के दराने घसरण दिसली. एकूणच घसरण साचेबद्धरीत्या होत असताना 1990 च्या दशकानंतर धोरणात्मक सुधारणा आणि आर्थिक स्थैर्याने घसरणीची स्थिती कायम राहिली.

अर्थात गेल्या एक वर्षात रुपयातील घसरण 4.7 टक्क्यांपेक्षा अधिक दिसली असून ती तात्कालिक वाटत आहे. एक सक्षम अर्थव्यवस्था म्हणजे त्याचे चलनही खणखणीत असणे होय, असा सर्वसाधारण समज. पण सध्याच्या काळात ही संकल्पना चुकीची ठरत आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार (जीडीपी) हा 2014 मध्ये 2.07 ट्रिलियन डॉलर होता आणि तो आता 2025 मध्ये 4.18 ट्रिलियन डॉलरवर पोचला आहे. यादरम्यान प्रतिव्यक्तीचे उत्पन्न देखील 1554 डॉलरवरून 2878 डॉलरवर पोहोचले आहे.

सध्याच्या मूल्याच्या आधारावर जीडीपीकडे पाहिल्यास त्याचा आकार तीन पटींनी वाढलेला दिसतो.

2014-15 मध्ये 106.6 लाख कोटी रुपये असणारे भांडवल 2024-25 मध्ये 331.03 लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. विशेष म्हणजे गेल्या दोन वर्षांत रुपये / डॉलरच्या विनिमय दरातील चढउतार सारखा राहिलेला नाही. मागील तिमाहीत भारताचा जीडीपी वाढीचा दर 8.2 टक्क्यांवर पोहोचला आहे. वेगवान आर्थिक विकासामुळे सामान्यपणे कोणत्याही देशाचे चलन सक्षम असायला हवे. मात्र भारतात विरोधाभासात्मक अनुभव येतो. आपल्याकडे जीडीपी वाढला तरी रुपयाचे अवमूल्यन दिसते. कारण विनिमय दरातील चढउतार हा केवळ जीडीपी ग्रोथने नाही तर अनेक घटकांमुळे होतो आणि त्याचा परिणाम परकी चलनाची मागणी आणि पुरवठ्यावर होतो.




पहिले म्हणजे विनिमय दर हा केवळ जीडीपी ग्रोथवर अवलंबून नसतो तर भांडवली प्रवाहावर ठरत असतो. सक्षम विकास असतानाही परकी गुंतवणूकदार जागतिक अनिश्चितता, आपापल्या देशातील वाढते व्याज दर, जोखमीपासून दूर राहण्याची प्रवृत्ती या कारणामुळे भांडवल काढून घेत असतील तर कोणत्याही देशाचे चलन कमकुवत होणे स्वाभाविक आहे. भारतातही हेच चित्र दिसत आहे.

## प्रासंगिक »

### चुकांतून मिळालेले शहाणपण

***विनोद आणि अजय हे जिवलग मित्र होते. ते एकाच वर्गात शिकत होते; पण दोघांचा स्वभाव वेगळा होता. विनोद मन लावून अभ्यास करायचा,***

शिक्षकांचे लक्षपूर्वक ऐकायचा आणि गृहपाठ वेळेवर पूर्ण करायचा. त्यामुळे तो नेहमी वर्गात पुढे असायचा व शिक्षकांची शाबासकी मिळवायचा. अजय मात्र अभ्यासाकडे दुर्लक्ष करायचा. वर्गात लक्ष न दिल्यामुळे त्याला शिक्षकांकडून वारंवार बोलणी खावी लागत. एके दिवशी विज्ञानाच्या शिक्षकांनी गृहपाठ करण्याची ठराविक पद्धत सांगितली. सर्व विद्यार्थ्यांनी गृहपाठ नीट केला; पण अजयने लक्ष न दिल्यामुळे गृहपाठ चुकीच्या पद्धतीने केला. त्याची वही पाहून शिक्षक रागावले व सुट्टी होण्यापूर्वी गृहपाठ पूर्ण करण्यास सांगितले. अजय घाबरला. अजयची अवस्था पाहून विनोदने त्याला समज दिली. शिक्षकांची परवानगी घेऊन त्याने नवीन वही आणली व अजयसोबत बसून गृहपाठ पूर्ण करून दिला. या घटनेनंतर अजयने आपला स्वभाव बदलला.

**तात्पर्य-** लक्षपूर्वक काम करणे आणि विवेकबुद्धी वापरणे फार महत्त्वाचे आहे. या सवयी अंगीकारल्यास संकटांवर मात करता येते आणि होणारे नुकसान टाळता येते.

संयुक्त राष्ट्रसंघाने यंदाचे वर्ष जागतिक स्तरावर कुरणांचे पर्यावरणीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरे करण्याचे जाहीर केले आहे. याआधीच ६ मे हा जागतिक कुरण दिन म्हणून साजरा केला जात असून, त्या माध्यमातून गवताळ प्रदेशांचे महत्त्व आणि त्यांच्यापुढील आव्हाने जगासमोर मांडली जात आहेत.

# निसर्ग, संस्कृती आणि उपजीविकेचा आधार


तरीही कुरण जमीन ही पडीक, नापीक आणि उपयोगहीन समजून, विमानतळे, औद्योगिक वसाहती, नागरी विस्तार आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नष्ट केली जात आहे. परिणामी जगभरातील गवताळ परिसंस्था झपाट्याने लुप्त होत आहेत.

आज पृथ्वीवरील सुमारे २४ टक्के भूभाग गवताळ प्रदेशाने व्यापलेला आहे. परंतु विकास प्रकल्पांच्या नावाखाली या भूमीचा वापर वाढत असल्याने त्यांचे अस्तित्व संकटात आले आहे. इसवी सन पूर्व १० हजार वर्षांपूर्वी पशुपालनाची सुरुवात झाली आणि त्यातून कुरणांचे महत्त्व मानवाला उमगले. भारतीय परंपरेत गायराने, गव्हाणी, गोठणी यांसारखी कुरणे पाळीव गुरेढोरे, मेंढ्या, बकऱ्या व उंट यांच्यासाठी राखून ठेवली जात. या कुरणांमध्ये औषधी वनस्पती, तृणपाती आणि अनेक तृणहारी व जंगली प्राण्यांचा अधिवास होता.

कुरणे जमिनीची धूप रोखण्यास, मृदेचे आरोग्य टिकवण्यास आणि पावसाचे पाणी साठवण्यास महत्त्वाची भूमिका बजावत होती. या कुरणांतून मिळणाऱ्या चाऱ्यामुळे जनावरांना प्रथिने, कॅल्शियम, फॉस्फरस आणि जीवनसत्त्वे मिळत. कृत्रिम खाद्यान्न उपलब्ध नसताना ही कुरणे पशुपालनाचा कणा होती. मृग, चितळ, चौशिंगा, गवा यांसारखे तृणहारी प्राणी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेले बिबटे व वाघ यांचे जीवन याच गवताळ प्रदेशांवर आधारलेले होते.

मात्र अलीकडच्या काळात काजू, अननस यांसारख्या नगदी पिकांची लागवड, तसेच युकालिप्टस व अकेशियाची एकसुरी वृक्षलागवड यामुळे मूळ गवताळ परिसंस्था नष्ट होत आहे. त्यामुळे वन्यप्राणी शेतीकडे वळत असून मानव-वन्यजीव संघर्ष वाढत आहे. त्याचबरोबर पशुपालक समाज विस्थापित होत असून त्यांची पारंपरिक उपजीविका धोक्यात आली आहे.

महाराष्ट्र, गोवा, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीतील कुरणांनी युक्त पठारांवर पुरातत्वीय वारसा आणि जैवविविधतेचा अनमोल ठेवा आहे. मात्र औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि उत्खननामुळे हे वैभव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे कुरणांचे संवर्धन व संरक्षण करणे ही काळाची गरज असून, निसर्ग, समाज आणि पुढील पिढ्यांसाठी ही जबाबदारी तातडीने स्वीकारणे आवश्यक आहे.



## ।। अभंगवाणी ।।



आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करीं ॥१॥

शब्दांचीच शेती शब्दांचीच माया ।
शब्दांमाजी पाया मोक्षाचा ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : सौरभ जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्र सदन बांधकाम प्रकरणाला पूर्णविराम

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागानंतर ईडीच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातूनही दिलासा

महाईन्यूज
मुंबई : **दिल्लीतील 'महाराष्ट्र सदन'च्या बांधकामाशी संबंधित सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) मंत्री छगन भुजबळ यांना विशेष न्यायालयाने शुक्रवारी दोषमुक्त केले.**



### ईडीचा आरोप

महाराष्ट्र सदनाचा मूळ अंदाजित खर्च १३.५ कोटी रुपये होता, परंतु नंतर तो वाढवून ५० कोटी रुपये करण्यात आला. ईडीच्या आरोपांनुसार, भुजबळ यांना के. एस. चमणकर कंपनीकडून १३.५ कोटी रुपयांची लाच मिळाली. तर कंपनीने महाराष्ट्र सदन आणि इतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांमधून सुमारे १९० कोटी रुपयांचा नफा कमावला. भुजबळ यांच्यासह पंकज आणि समीर भुजबळ तसेच इतर पाच जणांना २०२१ मध्ये विशेष विशेष एसीबी न्यायालयाने दोषमुक्त केले होते. चमणकर यांनाही दोन्ही न्यायालयाने याआधीच दोषमुक्त केले आहे.

दिल्लीतील 'महाराष्ट्र सदन'च्या बांधकामाशी संबंधित सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) मंत्री छगन भुजबळ यांना विशेष न्यायालयाने शुक्रवारी दोषमुक्त केले.

या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) दाखल केलेल्या गुन्ह्यातून भुजबळ यांना आधीच दोषमुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे या गुन्ह्याच्या आधारे दाखल केलेले ईडीचे प्रकरण कायम राहू शकत नाही, असे न्यायालयाने भुजबळ यांना दिलासा देताना नमूद केले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे महाराष्ट्र सदन बांधकाम प्रकरणाला पूर्णविराम मिळाला आहे.

भुजबळ हे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी महाराष्ट्र सदनाच्या बांधकामासाठी के. एस. चमणकर या बांधकाम कंपनीला कंत्राट दिले. त्या मोबदल्यात भुजबळ कुटुंबीयांना लाच मिळाली होती, असा तपास यंत्रणेचा आरोप होता. त्याचप्रमाणे कंपनीने भुजबळ यांचा मुलगा पंकज आणि पुतण्या समीर हे संचालक असलेल्या कंपनीच्या खात्यात लाचेची रक्कम हस्तांतरित केली होती. या प्रकरणी एसीबीने गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर, त्या आधारे ईडीने भुजबळ यांच्याविरुद्ध तपास सुरू केला. भुजबळ यांना या प्रकरणी अटकही केली गेली.

अडीच वर्षे कारागृहात काढल्यानंतर भुजबळ यांची जामिनावर सुटका झाली होती. त्यानंतर, त्यांनी दोषमुक्तीच्या मागणीसाठी आधी एसीबी न्यायालयात अर्ज केला होता. न्यायालयाने त्यांचा अर्ज स्वीकारून त्यांना त्यातून दोषमुक्त केले. या पार्श्वभूमीवर भुजबळ यांनी सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक गैरव्यवहार प्रकरणांशी संबंधित दिलेल्या निकालाचा हवाला देत ईडी प्रकरणातूनही दोषमुक्त करण्याची मागणी केली होती.

मूळ गुन्हा रद्द झाल्यानंतर त्या आधारे दाखल केलेला गुन्हा टिकू शकत नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. तर ईडीला स्वतःहून गुन्हा दाखल करण्याचे अधिकार नाही, अन्य तपास यंत्रणांनी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आधारे ईडी प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहारांचा तपास सुरू करते.

सर्वोच्च न्यायालयाच्या याच निर्णयाचा आधार घेऊन भुजबळ यांनी आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) विशेष न्यायालयात दोषमुक्तीसाठी अर्ज केला होता. विशेष पीएमएलए न्यायालयाचे न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी भुजबळ आणि प्रकरणातील इतर आरोपींनी केलेला दोषमुक्तीचा अर्ज स्वीकारला आणि त्यांना दोषमुक्त केल्याचे स्पष्ट केले.

# देवगड सागरी हद्दीत कर्नाटकची नौका जप्त

महाईन्यूज
सावंतवाडी : **महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत अनधिकृतपणे मासेमारी करणाऱ्या परप्रांतीय नौकांविरोधात मत्स्यव्यवसाय विभागाने कडक पावले उचलली आहेत. देवगड समोरील समुद्रात गस्त घालत असताना कर्नाटक राज्यातील 'हनुमा वैभवा' ही नौका अवैध ट्रॉलिंग करताना पकडण्यात आली.**



### चौथी मोठी कारवाई

देवगड पथकाची परप्रांतीय नौकांवरील ही चौथी, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण दहावी मोठी कारवाई आहे. या नौकेवर तांडेलसह ७ खलाशी होते. नौका देवगड बंदरात आणण्यात आली असून त्यातील मासळीचा लिलाव सुरू आहे. यातून मिळणारा पैसा शासकीय खजिन्यात जमा होईल. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ आणि सुधारित अधिनियम २०२१ नुसार ही कारवाई करण्यात आली आहे. सहाय्यक आयुक्त सागर कुवेसकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अहवाल तयार करण्यात आला असून, सुनावणीनंतर नौकामालकावर मोठी दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. या मोहिमेत किरण वाघमारे यांच्यासह संतोष ठुकरुल, धाकोजी खवळे, योगेश फाटक, अमित बांदकर, नेसवंणकर आणि सावजी यांनी सहभाग घेतला.

### वेगवान पाठलाग करून कारवाई

देवगड परवाना अधिकारी किरण वाघमारे यांच्या नेतृत्वाखालील पथक गस्तीवर असताना, समुद्रकिनारी १६ ते १८ वावा खोलीवर ही नौका मासेमारी करताना आढळली. गस्ती नौकेला पाहताच कर्नाटकच्या नौकेने पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने पाठलाग करून तिला ताब्यात घेतले. या नौकेकडे महाराष्ट्राच्या हद्दीत मासेमारी करण्याचा कोणताही वैध परवाना नव्हता.

# H-1B व्हिसामुळे अमेरिकेतील नोकऱ्या संकटात

## फ्लोरिडा विद्यापीठांत नवीन भरतीवर एक वर्षाच्या बंदीचा निर्णय प्रस्तावित

**महाईन्यूज**

**अमेरिकेतील नोकऱ्या वाचविण्यासाठी आणि परदेशी कामगारांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अमेरिकेतील फ्लोरिडा हे राज्य मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे. राज्यातील विद्यापीठांत एच – वन बी व्हिसावर (H-1B) होणाऱ्या नवीन नियुक्त्या एक वर्षासाठी थांबविण्याचा विचार गव्हर्नर्स बोर्ड करत आहे.**

फ्लोरिडा गव्हर्नर्स बोर्डाच्या २९ जानेवारी २०२६ रोजीच्या बैठकीत हा ठराव सादर केला जाणार आहे. गव्हर्नर्स बोर्डने हा ठराव संमत केल्यानंतर फ्लोरिडातील सार्वजनिक विद्यापीठांना २०२७ च्या सुरुवातीपर्यंत एच-१बी व्हिसावर नवीन प्राध्यापक किंवा कर्मचारी नियुक्ती करता येणार नाही. यानंतर आता प्रतिभावान कर्मचाऱ्यांची भरती आणि स्थलांतर धोरणावरून वाद सुरू झाला आहे.

### गुरुवारी फैसला

दरम्यान, २९ जानेवारी २०२६ रोजी गव्हर्नर्स बोर्डपुढे हा ठराव मांडला जाईल. ठराव संमत झाल्यास फ्लोरिडातील विद्यापीठांत कर्मचारी नियुक्तीबाबत नव्याने चर्चेला सुरुवात होईल. एच- वन बी व्हिसाद्वारे होणारी कर्मचारी नियुक्त्यांमुळे अमेरिकन नोकऱ्या संकटात आल्यात का? याबाबतही चर्चेला पेव फुटणार आहे.




### बंदीची मागणी का होत आहे?

"सार्वजनिक पैशातून उभ्या राहिलेल्या विद्यापीठांत नोकरीसाठी अमेरिकन नागरिकांना प्राधान्य द्यायला हवं. एच-वन बी व्हिसाद्वारे होणाऱ्या नियुक्त्यांमुळे अमेरिकन उमेदवारांवर अन्याय होत आहे", असा दावा या बंदीच्या समर्थकांनी केला आहे.

### फ्लोरिडाचा नवा ठराव काय आहे?

या ठरावानुसार फ्लोरिडातील सार्वजनिक विद्यापीठांना एच-वन बी व्हिसाद्वारे होणारी नवीन कर्मचारी भरती किमान एक वर्षासाठी करता येणार नाही. यामुळे विद्यमान एच – वन बी व्हिसा धारकांना फटका बसणार नाही. पण, विद्यापीठांना नवीन कर्मचारी, संशोधकांची भरती करता येणार नाही. ठराव संमत झाल्यास राज्यभरात त्याची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे.

### फ्लोरिडा विद्यापीठांत सध्या किती एच – वन बी व्हिसाधारक कार्यरत आहेत?

फ्लोरिडामधील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये जवळपास ४०० एच-वन बी व्हिसाधारक कार्यरत आहेत. "परदेशी उमेदवारांच्या नियुक्तीवर अधिक भर दिला जात आहे. कौशल्य आधारीत क्षेत्रात विद्यापीठ कशापद्धतीने कामं करतात हे या संख्येतून दिसते", असे मत एच – वन बी व्हिसा बंदीचे समर्थक मांडत आहेत.

### बंदी घातल्यास काय होऊ शकते?

"अशी बंदी घातल्यास अधिक मागणी असलेल्या विषयांसाठी कर्मचारी भरतीला अडथळा येऊ शकतो", असे मत विद्यापीठांनी मांडले आहे. "विद्यापीठांची मान्यता आणि मोठ्या प्रकल्पांसाठी स्पर्धात्मकता टीकवणे, आरोग्य क्षेत्रात प्रतिभावान व्यक्ती टीकवून ठेवणे अशा समस्या येऊ शकतात", असेही विद्यापीठांनी म्हटले आहे. "उच्च शिक्षितांची संख्या मर्यादीत असल्यास किंवा संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील जागांसाठीच एच- वन बी पर्यायाचा वापर करुन नियुक्त्या केल्या जातात", असेही स्पष्टीकरण विद्यापीठांनी दिले आहे.

# ५०% टॅरिफवर राहुल गांधींचा मोदींवर हल्लाबोल

**महाईन्यूज**

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अमेरिकन टॅरिफमुळे भारतीय वस्त्रोद्योगाला होत असलेल्या नुकसानीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तीव्र टीका केली. 'अमेरिकन टॅरिफमुळे वस्त्रोद्योग प्रचंड अनिश्चिततेत सापडला असून, पंतप्रधानांनी आपल्या दुर्बलतेचा परिणाम अर्थव्यवस्थेवर पडू देऊ नये,' असे राहुल गांधींनी म्हटले.**



### 'डेड इकॉनॉमी' वर पुन्हा टीका

'राहुल गांधी पुढे म्हणतात, 'पंतप्रधान मोदींनी ना कोणतीही सवलत दिली आहे, ना टॅरिफवर चर्चा केली आहे. साडेचार कोटींहून अधिक नोकऱ्या आणि लाखो व्यवसाय धोक्यात असताना सरकार शांत आहे. नोकऱ्यांचा ऱ्हास, कारखाने बंद होणे आणि ऑर्डर कमी होणे, हीच आजच्या 'डेड इकॉनॉमी'ची वास्तविकता आहे.'

### मानेसरमधील वस्त्रोद्योग कारखान्याला भेट

राहुल गांधी यांनी हरियाणातील गुरुग्रामजवळील एका वस्त्रोद्योग कारखान्याला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी कामगार आणि व्यवस्थापनाशी संवाद साधला. या दौऱ्याचा व्हिडिओ त्यांनी आपल्या यूट्यूब चॅनलवर शेअर केला. यावेळी राहुल गांधी म्हणाले, 'मोदीजी, या विषयावर तुमची थेट जबाबदारी आहे. कृपया याकडे गांभीर्याने लक्ष द्या.'

### ५० टक्के टॅरिफ, सर्व बाजूंनी दबाव

'अमेरिकेने सुमारे ५० टक्के टॅरिफ लावला आहे. युरोपमध्ये किमती घसरत आहेत, बांगलादेश आणि चीनकडून तीव्र स्पर्धा आहे. त्यामुळे भारतीय वस्त्रोद्योग आणि निर्यातदार सर्व बाजूंनी पिळले जात आहेत. याचा थेट परिणाम रोजगारावर होत असून, कारखाने बंद पडत आहेत, ऑर्डर कमी होत आहेत आणि संपूर्ण क्षेत्रात अस्थिरता पसरली आहे', असेही राहुल गांधींनी नमूद केले.

### रोजगाराच्या दृष्टीने दुसरा सर्वात मोठा क्षेत्र

राहुल गांधी पुढे म्हणाले, 'भारतातील वस्त्रोद्योग हा रोजगार निर्मितीच्याबाबतीत दुसरा सर्वात मोठे क्षेत्र आहे. भारतीय कपड्यांना जगभर मागणी आहे आणि आपल्या कारागिरांच्या कौशल्याला तोड नाही. मात्र, अमेरिकेने लावलेल्या टॅरिफमुळे या क्षेत्रात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे.'



# प्रियंका चोप्राच्या एका 'लाईक'मुळे वाद; दीपिका पादुकोणचे चाहते संतप्त

बॉलिवूडसह आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या प्रियंका चोप्रा आणि दीपिका पादुकोण या दोघीही लोकप्रिय अभिनेत्री आहेत. मात्र सध्या सोशल मीडियावर या दोघींच्या नावामुळे एक नवा वाद निर्माण झाला आहे. यामागचं कारण ठरलं आहे प्रियंका चोप्राने केलेले इंस्टाग्रामवरील एक लाईक.

नेमकं काय घडलं?

सोशल मीडियावर एका कंटेंट क्रिएटरची रील सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या रीलमध्ये प्रियंका चोप्राच्या कामाविषयी कौतुक करत तिच्या मेहनतीला "खरी डेडिकेशन" असं म्हटलं आहे. रीलमध्ये असं सांगण्यात आलं की, प्रियंका फक्त १२ तासांसाठी मुंबईत आली, शूटिंग पूर्ण केलं आणि पुन्हा अमेरिकेला रवाना झाली. मात्र याच रीलमध्ये दीपिका पादुकोणच्या ,(DEEPIKA PADUKONE) ८ तासांच्या शिफ्टवर प्रश्नचिन्ह



उपस्थित करण्यात आलं, ज्यामुळे अनेकांनी हे दीपिकाविरोधात असल्याचं म्हटलं.

प्रियंकाच्या चाहत्यांची बाजू

दुसरीकडे प्रियंका चोप्राच्या चाहत्यांनी तिची बाजू घेतली आहे. त्यांच्या मते, एखादी पोस्ट लाईक करणं म्हणजे त्या पोस्टमधील प्रत्येक मुद्द्याशी सहमत असणं आवश्यक नाही. प्रियंकाला विनाकारण या वादात ओढलं जात असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

# ताराच्या हातात दिसली एंगेजमेंट रिंग?



बॉलिवूड अभिनेत्री तारा सुतारिया सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. काही आठवड्यांपासून तारा आणि वीर पहाडिया यांच्या ब्रेकअपच्या अफवा जोरात होत्या. या बातम्यांमुळे चाहत्यांमध्ये नाराजी होती. मात्र आता ताऱ्याच्या एका सोशल मिडिया पोस्टमुळे या चर्चांना नवं वळण मिळालं आहे. तारानं नुकताच इन्स्टाग्रामवर एक स्टायलिश फोटो शेअर केला असून तो पाहताच व्हायरल झाला. या फोटोत तारा नेहमीप्रमाणे सुंदर दिसत आहे. ती काळ्या रंगाच्या मगमधून कॉफी पिताना दिसतेय. मात्र या फोटोत तिच्या सौंदर्यपिक्षा हातातील मोठ्या डायमंड रिंगनं सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. कॉफीपेक्षा अंगठी ठरली चर्चेचा विषय

फोटोमध्ये ताराच्या हाताच्या रिंग फिंगरवर मोठी हिऱ्याची अंगठी स्पष्टपणे दिसते.

फोटो पोस्ट होताच सोशल मीडियावर प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली "ही एंगेजमेंट रिंग आहे का?" "ताराने गुपचूप साखरपुडा केला आहे का?" असे अनेक प्रश्न चाहते विचारू लागले. ओरीच्या कमेंटनं वाढली उत्सुकता या पोस्टवर सोशल मीडिया सेन्सेशन ओरी यानं केलेल्या कमेंटमुळे चाहत्यांचा संशय अधिकच बळावला. एका युजरनं लिहिलं, "ही प्रपोजल रिंग आहे का?" तर दुसऱ्यानं म्हटलं, "मग साखरपुड्याचा व्हिडीओ कधी पाहायला मिळणार?" काही चाहत्यांचं असंही म्हणणं आहे की तारा आणि वीर यांच्यात सगळं ठिक आहे आणि ही अंगठी त्यांच्या नात्याच्या पुढील टप्प्याचं संकेत असू शकते.

ब्रेकअपच्या अफवांची पार्श्वभूमी

तारा आणि वीर यांच्या ब्रेकअपच्या चर्चा तेव्हा सुरू झाल्या, जेव्हा ए.पी. ढिल्लनच्या कॉन्सर्टमधील ताराचा एक व्हिडीओ व्हायरल झाला. त्या व्हिडीओत तारा आणि ए.पी. ढिल्लन यांच्यातील जवळीक पाहून वीर पहाडिया अस्वस्थ दिसत असल्याचं बोललं गेलं. त्यानंतर दोघांनी वेगळ्या वाटा निवडल्याच्या बातम्या समोर आल्या. मात्र, या अफवांवर तारा किंवा वीर कोणाकडूनही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

# नेहा धूपियाचा घरगुती उपाय



आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेकांना पोट फुगणं, अपचन, जडपणा अशा समस्या सतावत आहेत. या त्रासांवर घरच्या घरी करता येईल असा एक सोपा आणि नैसर्गिक उपाय अभिनेत्री नेहा धुपिया हिने शेअर केला आहे. सोशल मीडियावर नेहमीच फिटनेस आणि हेल्दी लाइफस्टाईलबाबत मार्गदर्शन करणारी नेहा यावेळी तिचं खास अँटी-ब्लोटिंग ड्रिंक चाहत्यांसोबत शेअर करताना दिसली.

# सर्फराज खानचा 'रुद्रावतार'!

## हैदराबादच्या गोलंदाजांना धुतलं; धडाकेबाज द्विशतकासह घडवला इतिहास

**महाईन्यूज**

**नवी दिल्ली : भारतीय कसोटी संघातील मधल्या फळीतील फलंदाज सर्फराज खानला जेव्हा जेव्हा संधी मिळाली, तेव्हा त्याने संधीचं सोनं करून धावांचा पाऊस पाडला. पण एकदा संघाबाहेर पडल्यानंतर तो पुन्हा भारतीय संघात पुनरागमन करू शकलेला नाही.**

भारतीय कसोटी संघात अनेक बदल केले गेले, पण सर्फराज खानला संघात स्थान दिलं गेलं नाही. फिटनेसचं कारण देऊन संघाबाहेर केल्यानंतर त्याने आपल्या फिटनेसवर प्रचंड मेहनत घेतली. आता फलंदाजीतही सर्फराज खानचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. रणजी ट्रॉफीत हैदराबादविरूद्ध खेळताना त्याने दमदार द्विशतकी खेळी केली आहे.



सर्फराज खानने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफीत धावांचा पाऊस पाडून निवडकर्त्यांचं लक्ष वेधून घेतलं होतं. आता रणजी ट्रॉफीतही त्याने दमदार द्विशतक झळकावलं आहे. रणजी ट्रॉफी स्पर्धेतील दुसऱ्या टप्प्यातील सामन्यांना सुरूवात झाली आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये मुंबई विरूद्ध हैदराबाद सामना सुरू आहे. या सामन्यातील पहिल्या डावात मुंबईने ५०० धावांचा पल्ला गाठला आहे. यादरम्यान सर्फराज खानने २१९ चेंडूंचा सामना करत १०३ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना २२७ धावांची खेळी केली आहे. त्याने २०६ चेंडूत आपलं द्विशतक पूर्ण केलं. यादरम्यान त्याने १९ चौकार आणि ९ षटकार खेचले. त्याला साथ देत सिद्धेश लाडने १०४ धावांची खेळी केली.

हे द्विशतक सर्फराजसाठी खास ठरलं आहे. कारण या द्विशतकासह त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५००० धावा पूर्ण केल्या आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना त्याने ६४.३ च्या सरासरीने धावा केल्या आहेत. मुख्य बाब म्हणजे, २१ व्या शतकात पदार्पण करणाऱ्या कुठल्याही फलंदाजाने या सरासरीने फलंदाजी करून ५००० धावांचा पल्ला गाठला नव्हता.

### सर्फराज खानचा दमदार फॉर्म

भारतीय संघातून बाहेर असलेल्या सर्फराजने देशांतर्गत क्रिकेटमध्ये मिळेल त्या संधीचा फायदा घेत तिन्ही फॉरमॅटमध्ये शतकं झळकावली आहेत. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत आसामविरूद्ध फलंदाजी करताना त्याने ४७ चेंडूंचा सामना करत १०० धावांची दमदार शतकी खेळी केली होती. त्यानंतर विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत गोवाविरूद्ध फलंदाजी करताना त्याने ७५ चेंडूत १५७ धावा चोपल्या होत्या. आता रणजी ट्रॉफीतही त्याच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे.

या सामन्यात हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या मुंबईकडून सिद्धेश लाडने १०४ धावांची खेळी केली. तर सर्फराज खानने २२७ धावा केल्या. तर आकाश पारकरने ७५ धावांची खेळी केली. मुंबईने ८ गडी बाद ५३३ धावा केल्या आहेत.

# टी-२० वर्ल्डकप खेळण्यासाठी आता बांगलादेशची धडपड

**महाईन्यूज**

**नवी दिल्ली : भारत व श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२६ मधून बांगलादेशने माघार घेतली आहे. भारतात वर्ल्डकप सामने खेळणार नसल्याने संघाचे सामने इतर ठिकाणी व्हावेत अशी संघाची इच्छा होती. पण आयसीसीने बीसीबीची ही विनंती नाकारली. यानंतर बांगलादेशला अखेरीस 24 तासांचा अल्टीमेटम दिला आणि यानंतर भारतात वर्ल्डकप सामने खेळण्यास बांगलादेश बोर्डाने नकार दिला. पण आता वर्ल्डकप खेळण्यासाठी बांगलादेश हातपाय मारत आहे.**



टी-२० विश्वचषकातून बाहेर पडण्याचा धोका असलेल्या बांगलादेशने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) वाद निवारण समितीला (डीआरसी) पत्र लिहून आयसीसी बोर्डाने घेतलेला निर्णय रद्द करण्याची विनंती केली आहे. मुस्तफिजूर रहमानला आयपीएल २०२६ मधून बाहेर केल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव बांगलादेशने भारतात टी-२० विश्वचषक खेळण्यास नकार दिला. यानंतर, आयसीसी बोर्डाच्या बैठकीत बांगलादेशला भारतात सामना खेळावा लागेल असा निर्णय घेण्यात आला. त्यांना त्यांचा निर्णय कळविण्यासाठी एक दिवस देण्यात आला.

बांगलादेशची भूमिका अजूनही बदललेली नाही आणि त्यांनी आता वाद निवारण समितीकडे संपर्क साधला आहे, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. बांगलादेशची अपील समितीच्या अधिकारक्षेत्राबाहेर असल्याने त्यावर सुनावणी होणार नाही. आयसीसीने स्कॉटलंड संघाला स्टँडबायवर ठेवलं आहे. यापूर्वी, अमिनुल इस्लाम बुलबुल यांच्या नेतृत्वाखालील बीसीबीने शेवटचा उपाय म्हणून इंग्लंडचे मायकेल बेलॉफ (किंग्ज काऊन्सिल) यांच्या नेतृत्वाखालील डीआरसीशी संपर्क साधला.

"हो, बीसीबीने आयसीसी डीआरसीशी संपर्क साधला आहे कारण ते त्यांचे सर्व पर्याय शोधू इच्छित आहे," असे बीसीबीच्या एका सूत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर पीटीआयला सांगितले. जर डीआरसीचा निर्णय बीसीबीच्या विरोधात आला तर स्वित्झर्लंडमधील क्रीडा लवाद न्यायालय (सीएएस) कडेच संपर्क साधता येईल."

जर आयसीसी संविधान आणि विवाद निराकरण समिती (डीआरसी) च्या 'अटी आणि शर्ती' विचारात घेतल्यास, हे स्पष्ट होईल की आयसीसी संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध अपील ऐकण्याचा कोणताही अधिकार नाहीये. स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकनानंतर आयसीसी संचालक मंडळाने बांगलादेशचे सामने भारतात आयोजित करण्याच्या बाजूने १४-२ असे मतदान केले होते.

नझमुल म्हणाले की, बांगलादेशने भारतात न खेळण्याचा निर्णय बीसीबीने नाही तर सरकारने घेतला होता. डीआरसीच्या अटी आणि शर्तींच्या कलम १.३ नुसार, "समिती आयसीसी किंवा आयसीसी मेमोरँडम अँड आर्टिकल्स ऑफ असोसिएशन किंवा आयसीसीच्या कोणत्याही नियमांनुसार घेतलेल्या इतर कोणत्याही निर्णय घेणाऱ्या संस्थेच्या निर्णयांविरुद्ध अपील ऐकू शकणार नाही."

आयसीसी बोर्डाच्या एका सूत्राने सांगितले की, 'बांगलादेश डीआरसीकडे जाऊ शकतो, परंतु नियमांकडे पाहिलं तर, संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध अपील ऐकण्याचा अधिकार समितीकडे नसल्याने या प्रकरणाची सुनावणी होऊ शकत नाही.' वृत्तानुसार, आयसीसीचे अध्यक्ष जय शाह अंडर-१९ विश्वचषकासाठी नामिबियात होते. ते आता दुबईत परतले आहेत आणि बांगलादेशच्या बदली खेळाडूबाबत औपचारिक निर्णय शनिवारी जाहीर केला जाईल.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
दि. 24 जानेवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# बजाज पुणे ग्रँड टूर 2026 आंतरराष्ट्रीय सायकलिंगचा थरार



## अनुभवण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी; शहरात क्रीडा उत्सवाचे वातावरण

**महाईन्यूज**

**पिंपरी: ‘बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६’ या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा अंतिम आणि निर्णायक टप्पा आज पिंपरी-चिंचवड शहरातून यशस्वीपणे पार पडला. या स्पर्धेदरम्यान शहरातील विविध प्रमुख मार्गांवर रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने उपस्थित राहून नागरिकांनी सायकलपटूंचे टाळ्यांच्या गजरात व जल्लोषात स्वागत केले तसेच त्यांना प्रोत्साहन दिले. यामुळे संपूर्ण शहरात क्रीडा उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.**

स्पर्धेचा हा अंतिम टप्पा श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथून दुपारी १.३० वाजता सुरू होऊन पुणे शहरातील जंगली महाराज रोडवरील बालगंधर्व रंगमंदिर येथे दुपारी ४ वाजता संपन्न झाला. एकूण ९९.१५ किलोमीटर अंतराच्या या टप्प्यात पिंपरी-चिंचवड शहरातील राजीव गांधी ब्रिज (औंध), काळेवाडी फाटा, बास्केट ब्रिज (रावेत), डी. वाय. पाटील कॉलेज (आकुर्डी), भक्ती-शक्ती चौक, त्रिवेणीनगर चौक, दुर्गानगर चौक, इंद्रायणी नगर चौक, संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, भोसरी डिस्ट्रिक्ट सेंटर, स्पाईन रोड, जुना आरटीओ रोड, आयुक्त बंगला, एम्पायर इस्टेट ब्रिज अशा महत्त्वाच्या मार्गांवरून सायकलपटूंनी मार्गक्रमण केले.

आंतरराष्ट्रीय सायकलिंग महासंघाच्या (UCI) निकषांनुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत स्पर्धेसाठी केलेली पूर्वतयारी प्रत्यक्षात प्रभावी ठरली. रस्त्यांचे डांबरीकरण, चेंबर्स समपातळीवर आणणे, बीआरटी रेलिंगची दुरुस्ती व रंगरंगोटी, चौकांचे सौंदर्यीकरण, थर्मोप्लास्टिक पेंटिंग, पुलांचे सुशोभीकरण तसेच संपूर्ण मार्गाची विशेष स्वच्छता यामुळे शहराचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा चेहरा नागरिकांपुढे आला. स्पर्धेदरम्यान वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा, वैद्यकीय व आपत्कालीन सेवा यांचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले होते. काही वेळासाठी वाहतूक वळविण्यात आली असली तरी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करत संयम राखला आणि स्पर्धेचा आनंद घेतला. भित्तिचित्रे, सजावट आणि रस्त्यावरील शिस्तबद्ध नियोजनामुळे पिंपरी-चिंचवड शहरात क्रीडा, संस्कृती आणि जागतिक क्रीडा स्पर्धेचा सुंदर संगम पाहायला मिळाला. देश-विदेशातील नामवंत सायकलपटूंना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाल्याने नागरिकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या संपूर्ण नियोजनामुळे पिंपरी-चिंचवड शहराने आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्याची क्षमता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

### सुयोग्य वाहतूक व सुरक्षा व्यवस्थापन

वाहतूक वळवणे, सुरक्षा, वैद्यकीय व आपत्कालीन सेवांचे नियोजन प्रभावीपणे राबविण्यात आले. नागरिकांनी संयम व सहकार्य दाखवत स्पर्धेचा आनंद घेतला.

### जागतिक स्तरावरील आयोजनाची क्षमता सिद्ध

देश-विदेशातील नामवंत सायकलपटूंमुळे नागरिकांमध्ये उत्साह दिसून आला. आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेने आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे यशस्वी आयोजन करून आपली क्षमता पुन्हा सिद्ध केली.



### UCI निकषांनुसार भक्कम पूर्वतयारी

रस्त्यांचे डांबरीकरण, चौकांचे सौंदर्यीकरण, थर्मोप्लास्टिक पेंटिंग, पुलांचे सुशोभीकरण व विशेष स्वच्छतेमुळे पिंपरी-चिंचवड शहराचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा चेहरा समोर आला.

### आंतरराष्ट्रीय सायकलिंगचा भव्य थरार

‘बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६’ या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा अंतिम व निर्णायक टप्पा पिंपरी-चिंचवड शहरातून यशस्वीपणे पार पडला. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शहरात क्रीडा उत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

### ९९.१५ किमीचा निर्णायक प्रवास

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथून सुरू होऊन बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे संपलेल्या या टप्प्यात शहरातील प्रमुख चौक, पूल व मार्गावरून सायकलपटूंनी मार्गक्रमण केले.



# प्रतिभा कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## महाराष्ट्राच्या लोककलेचे बहारदार सादरीकरण; विद्यार्थ्यांच्या अभिनयाने रसिकांची मने जिंकली

**महाईन्यूज**

**पिंपरी : चिंचवड येथील कमला शिक्षण संस्थेच्या प्रतिभा ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन 'जल्लोष महाराष्ट्राच्या संस्कृतीचा' हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून अत्यंत धुमधडाक्यात साजरा झाला.**

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाला मंगलमय प्रारंभ झाला. महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचे आणि लोककलेचे दर्शन घडवणाऱ्या या कार्यक्रमात भूपाळी, वारकरी दिंडी, जोगवा, गोंधळ, कोळी नृत्य, शेतकरी जीवनावर आधारित नृत्य तसेच पोवाडा अशा विविध लोकनृत्य प्रकारांचे अत्यंत प्रभावी सादरीकरण करण्यात आले. पारंपरिक वेशभूषा, जोशपूर्ण ताल आणि विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध उद्योजक अनिल भांगडीया यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद पुणे विभागाचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी भूषविले. कँप जेमिनीचे संस्थापक सदस्य हिरामणी गवई यांची विशेष उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे भरभरून कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. वर्षा निगडे तसेच सर्व शिक्षकवर्गाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचे सादरीकरण पाहून महाविद्यालय, विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे विशेष कौतुक करण्यात आले.



या प्रसंगी कमला शिक्षण संस्थेचे संस्थापक-सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, बी.एड. कॉलेजच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम, प्रतिभा वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, प्रतिभा एमबीए महाविद्यालयाचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ. वृंदा जोशी, प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रविंद्र निरगुडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. वर्षा निगडे यांनी केले.

# अप्पू घर येथे 'स्वराज्य की लढाई' माहितीपट मोफत

**महाईन्यूज**

**पिंपरी : निगडी येथील अप्पू घर मनोरंजन केंद्रात येत्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २४ ते २६ जानेवारी या कालावधीत 'स्वराज्य की लढाई' हा सुमारे ३० मिनिटांचा माहितीपट मोफत दाखविण्यात येणार आहे, अशी माहिती अप्पू घरचे मुख्य संचालक डॉ. राजेश मेहता यांनी दिली.**






या माहितीपटात श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन, स्वराज्याची स्थापना तसेच त्यांच्या प्रमुख किल्ल्यांवरील ऐतिहासिक माहिती प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. अप्पू घर येथील मिनी थिएटरमध्ये हा माहितीपट दाखविण्यात येणार असून, माहितीपट पाहण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. मात्र, अप्पू घरच्या मनोरंजन केंद्रात प्रवेशासाठी नियमित प्रवेश शुल्क भरावे लागेल, असे डॉ. मेहता यांनी स्पष्ट केले.

डॉ. मेहता पुढे म्हणाले की, प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून तो आपल्या संविधान, इतिहास आणि स्वराज्याच्या मूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. मनोरंजनासोबत शिक्षण देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ पिंपरी-चिंचवड, पुणे, ग्रामीण भाग तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिक आणि पर्यटकांचा विश्वास संपादन केलेले अप्पू घर हे एक विश्वासार्ह मनोरंजन केंद्र म्हणून ओळखले जाते. या आगळ्या-वेगळ्या उपक्रमातून देशभक्ती, इतिहास आणि कुटुंबीयांचे मनोरंजन यांचा सुंदर संगम साधला जाणार आहे.

सध्या अप्पू घरच्या मिनी थिएटरमध्ये हा माहितीपट प्रति व्यक्ती ६० रुपये दराने दाखविण्यात येतो. मात्र प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने २४ ते २६ जानेवारीदरम्यान कोणत्याही वयोगटातील नागरिकांकडून माहितीपटासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, अशी माहिती देण्यात आली. याशिवाय, या कालावधीत येणाऱ्या पाहुण्यांसाठी तात्पुरत्या टॅटू पेंटिंगची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुलांसह कुटुंबीयांसाठी हा विशेष आकर्षणाचा भाग ठरणार असल्याचे अप्पू घरचे व्यवस्थापक धम्मपाल वाघमारे यांनी सांगितले.

Pune District Education Association's
## Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

**"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"**

**Confirm Your Application Now!**



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046